| MHST080006292012 | रे. दि. मु. क्रमांक १६१/२०१२ मधील नि. क्र. ७३ खालील आदेश. |
|---|---|
| | श्री. आनंदा मारुती गावडे विरुध्द श्री. दत्तराम बापूजी कबुले वगैरे |

**(आदेश पारित दिनांक २१.०६.२०२४)**

सदरचा अर्ज वादी यांनी दावा दुरुस्तीकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादीनुसार, सदरकामी प्रतिवादी नं. ४ मधुमती बाबुराव कबुले हिचे लग्न झालेले असलेने तिचे नव–याकडचे नाव सौ. मधुमती दादा यादव असे असून ती सटलवाडी पो. परींचे, ता. पुरंदर, जि. पुणे येथे रहाते त्यामुळे या दाव्यात सदर वादी यांनी दाखल केलेले ताकीद अर्जाचे नोटीसची बजावनी झालेली नाही. प्रतिवादी नं. ४ हिचे नावात दुरुस्ती करणे गरजेचे झालेले आहे तरी प्रतिवादी नं. ४ हिचे दाव्यातील नावात व पत्त्यात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी – मधुमती बाबुराव कबुले यास कंस करुन त्याऐवजी सौ. मधुमती दादा यादव, वय – ४० वर्षे, धंदा – घरकाम, रा. सटलवाडी, पो. परींचे, ता. परंदर, जि. पुणे अशी प्रतिवादी नं. ४ यांचे नावात दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असून सदर दुरुस्तीने दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल संभवत नाही. सदर दुरुस्ती करणेस परवानगी दिलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दाव्याचे अंतीम निराकारण होणेचे दृष्टीने सदर दुरुस्ती करणेस परवानगी देणे आवश्यक आहे. तरी प्रतिवादी नं. ४ यांचे नावात वरील प्रमाणे दुरुस्ती करणेस परवागनी मिळावी.

०३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादीनुसार, सदरील वादी यांनी दाखल केलेला अर्ज चुकीचा आहे. सदरचा अर्ज प्रामाणिकपणाचा नाही. सदर अर्जात कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा हि नम्र विनंती.

०४. सदरचा अर्ज, त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. सदरची दुरुस्ती ही नावासंदर्भातील आहे. दाव्यातील प्रार्थना व सद्य

परिस्थिती पाहता, अर्जातील नमूद केलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही, याउलट दावा गुणवत्तेवर काढण्यात मदतच होणार आहे. सदरची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची आहे. एकूणच सर्व परिस्थितीचा विचार करता, सदरची दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. परंतु, वादीमुळे दावा लांबणीप्रमाणे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज निशाणी क्र. ७३ हा मंजूर करण्यात येतो. |
| २. | सदरची कॉस्ट ही वादींनी प्रतिवादींना देण्यात यावी. |
| ३. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ४. | सदर आदेशाची दोन्ही पक्षांनी नोंद घ्यावी. |
| ५. | खर्चाबाबत आदेश नाही. |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.06.24 17:54:12 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांकः– २१.०६.२०२४ सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे–

न्यायालयाचे नाव : सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खंडाळा.

लघुलेखकाचे नाव : सौ. सुवर्णा संकेत शिंदे.

(एस.एस.शिंदे)

लघुलेखक